# 'ठक्कर्स' समूहातर्फे मोफत रोपे वाटप

नाशिक, दि. ६ (प्रतिनिधी) - ठक्कर्स उद्योग समूहातर्फे 'मिशन प्लॅन्टेशन' या योजनेंतर्गत क्रेडाई व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण नाशिक शहरात वृक्ष लागवड, रोपांचे वाटप व संगोपन यासंबंधी एक विशेष कार्यक्रम ठक्कर्स बझार येथे नुकताच झाला.



ठक्कर समूहातर्फे ठक्कर बाजार बस स्थानकात मोफत रोपवाटप उपक्रम शुभारंभप्रसंगी संचालक जितेंद्र ठक्कर, राजेंद्र ठक्कर, तसेच सामाजिक वनीकरणचे सहायक संचालक संजय लचके, प्रवीण पाटील, क्रेडाई नाशिकचे माजी अध्यक्ष किरण चव्हाण, सामाजिक वनीकरण उपसंचालक पी.एन. पाटील, एस.टी. विभाग नियंत्रक यामिनी जोशी, क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष जयेश ठक्कर, सुनील गावंडे, अमित रोहमारे आदी.

ठक्कर्स समूहातर्फे १५ ऑगस्टपर्यंत झाडांचे मोफत वाटप ठक्कर्स बझार येथे, तसेच त्र्यंबक रोडवर पीटीसीसमोर ठक्कर्स डोम येथे इंडिगो पार्क, गोविंदनगर येथे सुरू आहे. या कार्यक्रमात बोलताना ठक्कर्स समूहाचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांनी सांगितले की, ठक्कर्स उद्योग समूहाला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक लाख झाडे लावण्याचा आम्ही दोन वर्षांपूर्वी संकल्प केला होता. त्यापैकी ३५ हजार झाडांची लागवड आतापर्यंत पूर्ण झाली आहे. बाकी झाडांच्या लागवडीचे काम जोमाने पुढे चालविले जात आहे. यापैकी काही झाडे 'एक व्यक्ती एक झाड' या तत्त्वावर लावून त्यांचे संगोपन सध्या सुरू आहे. जी व्यक्ती झाड लावेल, त्या व्यक्तीने प्रत्येक महिन्यात त्याच्या वाढदिवसाच्या तारखेला त्या झाडाला सहकुटुंब भेट देऊन आपले त्या झाडाबरोबरचे स्नेहाचे नाते जोपासावे, अशी संकल्पना आहे.

एस.टी. विभाग नियंत्रक यांनी महामंडळातर्फे ग्रीन एस.टी. स्टॅण्डबरोबरच 'एक व्यक्ती एक झाड' हा उपक्रम सुद्धा राबविण्यात येईल, असे सांगितले. याप्रसंगी बोलताना सामाजिक वनीकरणचे उपसंचालक पी. एन. पाटील यांनी हरित महाराष्ट्र अभियान, तसेच रोप उपलब्धतेची माहिती दिली.

या कार्यक्रमाला क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष जयेश ठक्कर, माजी अध्यक्ष किरण चव्हाण, सुनील गावंडे, अमित रोहमारे, तसेच सामाजिक वनीकरण विभागाचे सहाय्यक संचालक प्रवीण पाटील, संजय लचके, तसेच माहिती व जनसंपर्क अधिकारी योगेश सातपुते आदी उपस्थित होते.